# मराठी अधिविभाग

# भौतिक सुविधा




# वर्ग खोल्या एम. ए. भाग- १ आणि भाग -२

मराठी अधिविभागामध्ये एम.ए. भाग १ च्या वर्गाकरीता एक, तर एम.ए. भाग २ च्या वर्गाकरीता एक वर्गखोली आहे. या वर्ग खोल्यात प्रत्येकी ५० बेंच, टेबल, खुर्ची, लाकडी रॅक उपलब्ध आहेत. तसेच अध्यापनासाठी प्रोजेक्टर व साऊंड सिस्टिम उपलब्ध आहेत.





# विभागप्रमुख व प्राध्यापक कक्ष





मराठी अधिविभागामध्ये विभागप्रमुखांकरीता एक स्वतंत्र कक्ष आहे. या कक्षामध्ये संगणक, टेलिफोन, फॅन, एल.सी.डी. फ्रिज इत्यादी साहित्य आहे. पुस्तकासाठी दोन कपाटे उपलब्ध आहेत. अधिविभाशी संबंधित विविध समितींच्या बैठका, विभागाला भेट देणाऱ्या पाहुण्यांशी सुसंवाद विभागप्रमुख सदर कक्षामध्ये साधतात. तसेच विभागातील प्राध्यापकांकरीता सहा स्वतंत्र कक्ष उपलब्ध आहेत. या कक्षांमध्येही संगणक, इंटरनेट सुविधा, आवश्यकतेनुसार कपाट व इतर सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. याशिवाय संत तुकाराम अध्यासन, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, अध्यासन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन या अध्यासनांकरिता स्वतंत्र कक्ष उपलब्ध आहेत.

# कार्यालय



मराठी अधिविभागामध्ये प्रशासकीय कामकाजाकरीता कार्यालय हा स्वतंत्र कक्ष कार्यरत आहे. सदर कार्यालयाद्वारे अधिविभाग, विद्यार्थी आणि विद्यापीठस्तरीय प्रशासन यांच्यामध्ये समन्वय साधला जातो. कार्यालयामध्ये संगणक, प्रिंटर, झेरॉक्स मशिन, कपाटे व इतर आवश्यक स्टेशनरी साहित्य उपलब्ध आहे.

# विभागीय ग्रंथालय

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मराठी विभाग अंतर्गत सन २०१४ रोजी तत्कालीन विभागप्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांनी मराठी विभागातील विद्यार्थांसाठी विभागात ग्रंथालय सुरु केले मराठी विभागातील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना ग्रंथाची माहिती व्हावी तसेच त्यांना आवश्यक असणारी पुस्तकें विभागातच उपलब्ध व्हावी या उद्देशाने ग्रंथालय सुरु केले आहे. २०१४ ते आज अखेर ग्रंथालयात विविध विषयावरील पाचशे त्रेचाळीस (५४३) ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी या ग्रंथामध्ये भर पडत आहे. 2020-21 या शैक्षणिक वर्षात मेहता प्रकाशन संस्थेकडून रूपये दहा हजार इतक्या रक्कमेची ग्रंथ खरेदी केले आहेत.

विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास आवश्यक असणाऱ्या साहित्यकृती त्याचबरोबर संदर्भ ग्रंथ विद्यार्थ्यांना व संशोधक विध्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा ग्रंथालयाचा प्रयत्न आहेत. विभागातील ग्रंथालय कथा, कांदबरी, कवितासंग्रह, ललितलेख संग्रह, प्राचिन मध्ययुगीन, साहित्यिकांचे ग्रंथ, विविध कोश वाङ्मयाचे खंड तसेच

ललित व ललितेतर ग्रंथांनी समृद्ध आहे. विभागातील ग्रंथालयाची जबाबदारी संशोधक विद्यार्थी पार पाडतात. ग्रंथालयातील सर्व ग्रंथाच्या नोंदी नोंदवहीमध्ये नोंदविल्या आहेत. तसेच विद्यार्थी ग्रंथ देवघेव नोंदी  नोंदवहीमध्ये नोंदविले जाते. ग्रंथालयामध्ये  एकूण ७ कपाटे, दोन टेबल, ८ खुर्च्या आहेत.





## विभागातील ग्रंथ संख्या - एकूण ५४३

| अ.क्र | वाङ्मय प्रकार | एकूण ग्रंथ |
|---|---|---|
| 1 | कथा | 60 |
| 2 | कादंबरी | 77 |
| 3 | नाटक | 40 |
| 4 | कोश | 02 |
| 5 | चरित्रपर | 05 |
| 6 | अनुवादीत | 10 |
| 7 | ललितलेख संग्रह | 11 |
| 8 | हिंदी साहित्य | 12 |
| 11 | समीक्षा | 242 |
| 12 | कविता | 63 |
| 13 | इंग्रजी | 21 |
| | **एकूण** | **543** |

# गोलमेज बैठक हॉल





मराठी अधिविभागामध्ये एक गोलमेज बैठक कक्ष आहे. या कक्षामध्ये राऊंड टेबल, ३० खुर्च्या, स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, सांऊड सिस्टीम, दोन एसी इत्यादी सुविधा आहेत. सदर हॉलमध्ये एम. फिल., पीएच. डी.च्या मौखिक परीक्षा आयोजित केल्या जातात. तसेच अधिविभागातील विविध बैठकांचे आयोजन केले जाते.

# पिण्याचे पाणी



अधिविभागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी कुलरची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी दररोज विद्यापीठाकडून शुद्ध पाणी उपलब्ध करून दिले जाते. वेळोवेळी कुलरची स्वच्छता करण्यात येते.

# स्वच्छतागृहे

मराठी अधिविभागामध्ये पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहेत. स्वच्छतागृहांमध्ये दिव्यांगासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# इतर सुविधा

वरील सुविधांबरोबर विभागातील उपक्रमांचे, विविध कार्यक्रमांचे छायाचित्रीकरण करण्यासाठी एक व्हिडिओ कॅमेरा, दोन फोटोग्राफी कॅमेरे, माईक सिस्टीम उपलब्ध आहेत. त्याचबरोबर कोरोनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी अलिकडेच तीन हॅण्ड सॅनिटायझर स्टँड आणि एक इलेक्ट्रीक सॅनिटायझर मशीन विद्यापीठ प्रशासनाकडून विभागास उपलब्ध करून देण्यात आले आहे.

❒❒❒